क्रमांक : २००३४ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २४ डिसेंबर, २०२१.

**: : कार्यालयीन आदेश : :**

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजीपासून महाराष्ट्र विधीमंडळाचे तृतीय (हिवाळी) अधिवेशन सुरू झाले आहे. विधानसभा / विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार राज्यातील कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन लसीकरणाचे दोन्ही डोस घेतलेले असले तरी अधिवेशन कालावधीत या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांची कोरोना विषाणू संसर्ग नसल्याबाबतचा अधिकृत प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त होणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने RT-PCR कोरोना चाचणी करण्याची सुविधा रविवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२१ रोजी सकाळी ०८.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत उपलब्ध होणार आहे. सदर दिवशी या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी RT-PCR कोरोना चाचणी करून घेण्यात यावी. त्यानुषंगाने रविवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२१ रोजी सार्वजनिक सुट्टी असली तरी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे कार्यालय सुरू राहणार असून उक्त दिवशी संवर्गनिहाय निश्चित केलेल्या वेळेनुसार हजेरीपट ठेवण्यात येईल. उपरोक्त दिवशी सर्व अधिकारी / कर्मचारी यांची १००% उपस्थिती अनिवार्य राहील. तसेच पुर्वी नोंदविलेल्या रजिस्टर क्रमांकावर RT-PCR कोरोना चाचणी करण्यात येणार असल्याने उक्त चाचणीसाठी पुन्हा माहिती नोंदविण्याची व टोकन क्रमांक घेण्याची आवश्यकता नाही. तसेच शनिवार, दिनांक २५ डिसेंबर, २०२१ रोजी कार्यालय चालू नसले तरीही अधिकारी / कर्मचारी RT-PCR चाचणी करु शकतील. RT-PCR चाचणीसंदर्भातील नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांनी शनिवार, दिनांक २५ डिसेंबर, २०२१ रोजी कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

आदेशानुसार,

**( सुभाष नलावडे )**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति,

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद / महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.

६) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) सर्व समिती प्रमुख यांचे कार्यालय.

८) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

१०) सर्व विधीमंडळ पक्ष कार्यालय.

११) व्यवस्थापक उपहारगृह, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१२) निवडनस्ती.

प्रतिलिपी :-

१) सर्व मंत्रालयीन विभाग.

२) उप अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

३) शाखा अभियंता (स्थापत्य), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.